



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १२५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१८ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# एकनाथ शिंदेंच्या भावाच्या रिसॉर्टमध्ये सापडले ११५ कोटींचे ड्रग्ज ??

## सुषमा अंधारेंचे प्रकाश शिंदे यांच्यावर गंभीर आरोप !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, सातारा :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भावाच्या रिसॉर्टमध्ये अंमली पदार्थ सापडल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. साताऱ्यातील सावरी गावात पोलिसांनी धाड टाकली. त्यावेळी एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या मालकीच्या रिसॉर्टमध्ये ११५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ सापडले, असा सनसनाटी आरोप अंधारे यांनी केला. त्यावेळी त्यांनी या संदर्भातील अनेक पुरावेदेखील दाखवले.

सावरी गावात असलेल्या रिसॉर्ट आणि त्या रिसॉर्टपासून काही अंतरावर असलेल्या शेडचा फोटो सुषमा अंधारे यांनी दाखवला. 'सावरी गावात रिसॉर्ट आणि शेड आहे. रिसॉर्ट आणि शेडचा तसा अर्थाअर्थी संबंध येत नाही. रिसॉर्ट आणि शेडमध्ये कोणताही रस्ता नाही. पण फोटोत आपल्याला एक पांढरी रेष दिसते. तिथे १२०० मीटरचा सिमेंट काँक्रिटचा रस्ता आहे. हा रस्ता महामार्गाला जोडलेला आणि शेडला जोडलेला आहे. या रस्त्याची मागणी कोणी केली होती, हा रस्ता कोणासाठी बांधला गेला. कारण या भागात आसपास कुठेही घरं नाहीत,' असं अंधारे म्हणाल्या.

'स्थानिकांच्या माहितीनुसार, रिसॉर्टपासून काही अंतरावर असलेल्या शेडमध्ये तीन जण राहायचे. ही शेड गोविंद शिनकरची आहे. त्यानं ती ओंकार डिगेला चालवायला दिली होती. याच शेडवर पोलिसांनी धाड टाकली आणि पोलिसांना अंमली पदार्थांचा साठा सापडला. जवळच असलेल्या रिसॉर्टमधून या शेडमध्ये जेवण जायचं. हे रिसॉर्ट प्रकाश शिंदे यांच्या मालकीचं आहे. त्यांच्या वडिलांचं नाव संभाजी आहे. त्यामुळे प्रकाश शिंदे हे एकनाथ शिंदे यांचे भाऊ असावेत, अशी शंका आली. आम्ही याबद्दल साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार जोशी यांना विचारलं. तेव्हा त्यांनी प्रकाश शिंदे आणि एकनाथ शिंदे यांचा संबंध नसल्याचं सांगितलं,' अशी माहिती सुषमा अंधारे यांनी दिली.

'प्रकाश आणि एकनाथ शिंदे यांच्या वडिलांचं नाव संभाजी आहे. त्यामुळे आम्ही काही सातबारा शोधले. तेव्हा आम्हाला एक वडिलोपार्जित सातबारा मिळाला. त्या सातबाऱ्यावर सुभाष संभाजी शिंदे, प्रकाश संभाजी शिंदे अशी नावं आहेत. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या भावांची नावं योगायोगानं तीच आहेत. आणखी एक योगायोग म्हणजे या हॉटेलचं नाव तेजयश असं आहे आणि प्रकाश शिंदेंच्या मुलांची नावं तेजस आणि यश अशी आहेत. हा पण योगायोग असेल,' असा सविस्तर तपशील अंधारे यांनी दिला.

'जिथे धाड पडली, त्याच गावात वाढदिवसाचा एक बॅनर आहे. रुद्रांश आणि दादाला आणि मोठ्या पप्पाला वाढदिवसाच्या शुभेच्छा असा मजकूर त्याच्यावर आहे. यातील मोठे पप्पा म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. शुभेच्छुक म्हणून तेजस आणि यश प्रकाश शिंदे यांची नावं आहेत,' अशी माहिती अंधारे यांनी वाढदिवसाच्या निमित्तानं लावण्यात आलेल्या पोस्टरचा फोटो दाखवत दिली.

प्रकाश शिंदे यांचं नाव पोलिसांनी का दडवलं, असा थेट सवाल सुषमा अंधारे यांनी केला. 'तो प्रकाश शिंदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भाऊ नाही, मग कोण आहे? एक वेळ मान्य केलं की तो दुसराच कोणीतरी आहे, मग ११५ कोटींचं ड्रग्ज प्रकरण असताना त्याला का सोडून देण्यात आलं? त्या शेडमध्ये काम करणाऱ्या तिघांना पंचतारांकित हॉटेलमधील जेवण कसं पुरवलं जात होतं? त्यांना ते कसं परवडत होतं? शेडमध्ये असं काय चालत होतं? त्याबद्दल प्रकाश शिंदे यांना कधी शंका आली नाही का,' अशी प्रश्नांची सरबत्ती अंधारे यांनी केली.

सुषमा अंधारे यांनी केलेले आरोप खोटे असल्याचं प्रकाश शिंदे म्हणाले आहेत. जिथे ड्रग्ज सापडलं, तिथपासून रिसॉर्ट लांब आहे. हे अंतर साधारणत: तीन ते साडे तीन किलोमीटर इतकं आहे. ते रिसॉर्ट माझं नाही. ते मी सहा महिन्यांपूर्वी रणजीत शिंदे यांना दिलं. मी ती जागा रणजीत यांना दिली. त्यामुळे त्याचा माझ्याशी काहीही संबंध नाही, असा दावा प्रकाश शिंदे यांनी केला.

# पाचगणी येथे अंमली पदार्थांचा धूर!

## पाचगणीत रेव्ह पार्टी उधळली; पोलिसांची मोठी कारवाई




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१७, पाचगणी :** सातारा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी ११५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ सापडल्याची घटना ताजी असतानाच, आता पाचगणी या प्रसिद्ध पर्यटनस्थळी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. एका रेव्ह पार्टीवर टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी कोकेनसह तब्बल ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पाचगणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील एका खासगी ठिकाणी काही तरुण अंमली पदार्थांचे सेवन आणि विक्री करण्यासाठी जमल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून रात्री उशिरा संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे १३ ग्रॅम कोकेन जप्त केले आहे. कोकेनसह महागड्या आलिशान गाड्या आणि इलेक्ट्रॉनिक साहित्य असा एकूण ४२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या पार्टीतून पोलिसांनी १० जणांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

पाचगणी आणि महाबळेश्वर ही ठिकाणे पर्यटनासाठी जगभरात प्रसिद्ध आहेत. मात्र, पर्यटनाच्या नावाखाली अशा थंड हवेच्या ठिकाणी अमली पदार्थांची विक्री आणि सेवन होत असल्याचे या कारवाईमुळे स्पष्ट झाले आहे. काही दिवसांपूर्वीच जिल्ह्यात कोट्यवधींचे अंमली पदार्थ सापडले होते, त्यानंतर आता थेट कोकेन सापडल्याने सातारा जिल्ह्याला ड्रग्जचा विळखा बसत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. जिल्ह्यातील अमली पदार्थांचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी सातारा पोलीस आता युद्धपातळीवर तपास करत आहेत. या प्रकरणाचे धागेदोरे कोणाशी जोडलेले आहेत आणि हे अमली पदार्थ कुठून आले, याचा शोध घेतला जात आहे. सलग होणाऱ्या या कारवायांमुळे अमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले असून, पर्यटकांच्या सुरक्षेचा आणि जिल्ह्याच्या प्रतिमेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# अखेर माणिकराव कोकाटेंचा मंत्रिपदाचा राजीनामा

**दि.१७, नाशिक :** नाशिक सत्र न्यायालयानं मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केलं होतं, त्यानंतर आता माणिकराव कोकाटे यांनी मोठा निर्णय घेतला असून, त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. नाशिकमधील सदनिका गैरव्यवहार प्रकरण माणिकराव कोकाटे यांना चांगलंच भोवलं आहे, हे प्रकरण १९९५ सालचं आहे, या प्रकरणात कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती, त्यानंतर आता नाशिक सत्र न्यायालयानं माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वारंट जारी केलं आहे, शिक्षेला स्थगिती देण्यात यावी यासाठी माणिकराव कोकाटे यांनी आज उच्च न्यायालयात देखील धाव घेतली होती, मात्र न्यायालयानं या प्रकरणावर तातडीनं सुनावणी घेण्यास नकार दिला. हाय कोर्टाकडून देखील कोकाटे यांना दिलासा मिळाला नाही. सध्या कोकाटे हे लिलावरी रुग्णालयात उपाचर घेत आहेत, दरम्यान त्यांनी दिवसभरात घडलेल्या घडामोडींनंतर अखेर आता आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

कोकाटे यांचं मंत्रिपद काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांकडे शिफारस केली होती. कोकाटे यांनी राजीनामा दिल्यानंतर कोकाटे यांच्याकडे असलेलं क्रीडा खातं कोणाला दिलं जाणार याबाबत देखील उत्सुकता निर्माण झाली होती, यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की त्याबद्दलचा निर्णय हे उपमुख्यमंत्री अजित पवारच घेतील, त्यामुळे आता कोकाटे यांच्या राजीनाम्यानंतर क्रीडा मंत्रालयाचा पदभार अजित पवार यांच्याकडे आला आहे.

# आदर्श आचारसंहिता नियमांचे काटेकोर पालन होण्याकडे बारकाईने लक्ष देण्याचे आयुक्तांचे निर्देश

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, नवी मुंबई :** म हानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता आदर्श आचारसंहिता लागू झाली असून आचारसंहिता कालावधीत सर्व नियम ांचे काटेकोर पालन व्हावे यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुख व विभाग अधिकारी यांच्या निवडणूकविषयक आढावा बैठकीप्रसंगी दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, निवडणूक विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे आणि इतर विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

१५ डिसेंबर रोजी सायंकाळपासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने अनाधिकृत बॅनर्स विरोधात धडक मोहीम हाती घेण्यात आली असून महानगरपालिकेच्या मालमत्तांवरील उद्घाटन - भूमिपूजनाच्या कोनशिला तसेच राजकीय व्यक्तींची नावे असलेले फलक झाकून घेण्यात येत आहेत. सदर कार्यवाही ४८ तासात काटेकोरपणे पूर्ण करावी व तशाप्रकारचा अहवाल सादर करावा असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.



निवडणूक ३० दिवसांनी असल्याने या कालावधीत निवडणूकीच्या कामाला संपूर्ण प्राधान्य द्यावे असे निर्देशित करतांनाच मतदान केंद्रांच्या जागांची पुनर्पाहणी करावी असे सूचित करण्यात आले. मतदान केंद्रांवर पुरविण्याच्या सुविधांकडेही बारकाईने लक्ष द्यावे व सर्व मतदान केंद्रांचे जिओ टॅगींग करुन घ्यावे म्हणजे त्याचा उपयोग नागरिकांसह सर्वांनाच होईल अशाही सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

डिस्ट्रिक इलेक्शन प्लॅन सारखा वॉर्ड इलेक्शन प्लॅन तयार करावा जेणेकरुन त्यातील टेम्प्लेटनुसार प्रत्येक बाबनिहाय कार्यवाही करणे व ती पूर्ण झाल्याची खात्री करणे सोयीचे ठरेल असे सूचित करतांनाच आयुक्तांनी दुबार मतदार यादीची पाहणी करण्याचे काम जलद व अचूक पूर्ण करावे असे निर्देश दिले.

निवडणूकीच्या अनुषंगाने आचारसंहितेचे पालन, मतदान केंद्रावरील सुविधा तसेच मतदार यादी या बाबींवर विशेष लक्ष देण्याचे निर्दे शित करतांनाच आयुक्तांनी प्रत्येक विभाग अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी यांच्याशी समन्वय राखावा आणि निवडणूक प्रक्रिया सुलभ होण्याकडे लक्ष द्यावे असे निर्देश दिले.

निवडणूकीच्या अनुषंगाने संबधित इतर प्राधिकरणांचे अधिकारी यांच्यासोबत बैठकीचे नियोजन करण्यात आले असून राजकीय पक्ष प्रतिनिधी व प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांच्याशीही आयुक्त डॉ. कैलास शिंदे संवाद साधणार आहेत.

# मुंबईत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत संभ्रम; नक्की कोणाचा हात पकडणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्षाने मुंबई महापालिकेत ५० जागा लढविण्याची तयारी सुरू केली आहे. पालिकेतील २२७ प्रभागांमध्ये निवडणूक लढविण्यासाठी पक्षाने इच्छुकांकडून अर्ज मागवले होते. परंतु, जेमतेम २५० कार्यकर्त्यांनीच निवडणुकीत उतरण्याची इच्छा दाखवली. त्यातही अनेकांनी दोन प्रभागांसाठी अर्ज केल्याने एकूण इच्छुकांची संख्या १००च्या आसपासच असल्याचे समजते. दरम्यान, काँग्रेसने महापालिका निवडणूक स्वतंत्र लढण्याची तयारी सुरू केल्याने काँग्रेससोबत जावे की ठाकरे बंधूंसोबत, याविषयी निर्णय झालेला नसल्याने कार्यकर्त्यांत संभ्रम आहे.




मुंबईत अस्तित्वासाठी चाचपडणाऱ्या राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर, दोन्ही पक्षांची ताकद विभागली गेली आहे. २०१७च्या महापालिका निवडणुकीत अखंड राष्ट्रवादीचे केवळ नऊ नगरसेवक निवडून आले होते. पक्षफुटीनंतर यापैकी पाच नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत गेले, तर दोन नगरसेवक अजित पवार यांच्यासोबत राष्ट्रवादीत दाखल झाले.

सध्या पक्षाच्या मुंबई अध्यक्ष राखी जाधव आणि मनीषा रहाटे या दोनच माजी नगरसेविका पक्षात आहेत. महापालिका निवडणुकीमध्ये तिकीट मिळण्याची संधी दिसत असल्याने इच्छुकांमध्ये उत्साह असेल, अशी अटकळ होती. त्यासाठीच इच्छुकांकडून सशुल्क अर्ज भरून घेत, त्यांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन होते. त्यासाठी १० नोव्हेंबरपासून विशेष मोहीमही आखली. परंतु, केवळ २५० इच्छुकांनीच निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली. यातील अनेक अर्ज हे एकाच उमेदवाराने दोन-तीन जागांसाठीही केले आहेत.

मुंबईत पक्षाचा ५० जागांवर निवडणूक लढविण्याचा विचार असल्याची माहिती एका वरिष्ठ नेत्याने 'मटा'शी बोलताना दिली. मुंबईत केवळ भाजप आणि शिवसेना एकत्र येण्याची शक्यता असून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला युतीतून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याचा फायदा राष्ट्रवादी शप पक्षाच्या उमेदवारांना नक्कीच होईल, असाही दावा या नेत्याने केला. मात्र निवडणूक जाहीर होऊन २४ तास उलटले, तरी आघाडीबाबत स्पष्टता नसल्याने कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

अक्षराज






## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

उत्तर प्रदेशातील मथुरा एक्सप्रेस वे वर मंगळवारी मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले. दाट धुक्यामुळे पहाटे साडे चारच्या सुमारास आठ बस आणि तीन मोटारी एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर वाहनांनी पेट घेतला यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ५९ जण गंभीर जखमी झाले. या अपघाताने देशभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात असा भीषण अपघात घडल्याची ही पहिली वेळ नाही याआधी असे अनेक अपघात देशात घडले असून त्यात लाखो लोकांचा जीव गेला आहे. गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

# सांताक्लॉज आणि पोतराज





लहानपणापासून दोन पात्रांबद्दल एक वेगळेच आकर्षण आणि उत्सुकता वाटत होती. ही दोन्ही पात्रे सामाजिक आणि धार्मिक प्रतिनिधित्व करणारी आहेत. त्यातील एक म्हणजे सांताक्लॉज ‑ ज्याला प्रगतीपथावरील समाजाने वाढवले, आपलेसे केले; दुसरा म्हणजे पोतराज जो आजही उपेक्षितच राहिला आहे.

सांताक्लॉज हे ख्रिश्चन धर्मात आणि संस्कृतीत आढळणारे काल्पनिक पात्र आहे. नाताळाच्या आदल्या दिवशी, म्हणजे २४ डिसेंबरला, सांताक्लॉज मध्यरात्री गुपचूप लहान मुलांना भेटवस्तू आणि खाऊ देतो, अशी समजूत आहे. सांताक्लॉजचे नाताळ सणाशी अतूट नाते आहे. खरंतर जगभरातील लहान मुलांचे ‘सांताक्लॉज’ हे एक अनोखे आणि अतिशय आवडते पात्र आहे. बालमनावर सांताक्लॉजच्या प्रेमळ व्यक्तिमत्त्वाची खोल छाप पडलेली असते.सांताक्लॉजचे खरे नाव संत निकोलस असे मानले जाते. संत निकोलस यांचा जन्म प्रभू येशूच्या मृत्यूनंतर सुमारे २८० वर्षांनी मायरा येथे एका श्रीमंत कुटुंबात झाला. त्यांच्या दानशूरपणाच्या अनेक कथा आजही सांगितल्या जातात. सांताक्लॉज म्हणजे लाल रंगाचा, पांढऱ्या फरचा पोशाख घातलेला वयस्कर पुरुष; पांढरी लांब दाढी, पायात काळे बूट, कमरेला काळा पट्टा आणि हातात किंवा पाठीवर खाऊ व खेळण्यांनी भरलेली मोठी कापडी पिशवी ‑ असे त्याचे रूप असते.

दुसरीकडे पोतराज हा देवीची उपासना करणारा लोकसंस्कृतीतील उपासक. ‘दार उघड बया, आता दार उघड’ असे मरीआई, लक्ष्मी आईला आवाहन करत आयुष्यभर देवीच्या नावाने भटकंती करत राहतो. देवीला पोतराज सोडण्याची पद्धत ही समाजातील अंधश्रद्धांचे देणे आहे. एखाद्या घरात मूल जगत नसेल, तर मूल वाचावे म्हणून त्याला देवीच्या नावाने ‘सोडतात’. त्यामागील समज अशी की देवीला सोडले म्हणजे ते देवीचे झाले आणि देवी त्याचे रक्षण करील. आषाढ महिन्यात पोतराजाला विशेष महत्त्व असते.

पोतराज पुरुष असूनही त्याच्या डोक्यावर स्त्रीप्रमाणे केस असतात. डोक्यावर आंबाडा बांधलेला असतो. कमरेला नवे–जुने अनेक हिरवे खण लोंबत असतात. कमरेला सैलसर घुंगरांची माळ अडकवलेली असते. पायात खुळखुळ्या ‑ म्हणजे वाजण्यासाठी आत खडे भरलेली मोठी पोकळ पितळी वाळे ‑ असतात. कपाळावर हळदी–कुंकवाचे पट्टे असतात. पोतराज अंगावर जो वेष धारण करतो, त्याला ‘आभरान’ म्हणतात.

ख्रिसमस जवळ आला की सांताक्लॉज मुलांना आकर्षित करू लागतो. पुतळे, पोस्टर्स, दुकानांतील सजावट यांतून तो भेटवस्तू घेऊन येणारा आनंददूत म्हणून समोर येतो. त्याचा आगळावेगळा वेश केवळ मुलांनाच नव्हे, तर मोठ्यांनाही भुरळ घालतो. त्याचप्रमाणे आषाढ महिन्यात पोतराजही सर्वांचे लक्ष वेधून घेतो. तो आकर्षक असतो, पण त्याच वेळी भीतीदायकही वाटतो. पोतराज येऊन आपली हालगी वाजू लागताच सर्व बाल–गोपाळ मंडळी त्यांच्याभोवती गराडा घालतात.

मरीआईची पूजा मांडणारा पोतराज हा मागास जातींतील सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक आहे. समाजाने नाकारल्यामुळे या जातींना स्वतःची देवदैवते निर्माण करावी लागली. पूजा आणि पुरोहितपणासाठी त्यांच्यातील काही लोकांना असे वेगळे रूप धारण करावे लागले. हातात आसूड घेऊन, गावोगावी फिरत गावाबाहेरच्या देवदेवतांची पूजा मांडणारा पोतराज सर्वांना समजेल अशा भाषेत मंत्रोच्चार करतो. गाणी म्हणतो आणि आपल्याच डोक्यावर देव देवतांचे देऊळ घेऊन फिरतो. सांताक्लॉज हा भेटवस्तू देणारा असतो, तर पोतराज हा धान्य किंवा भिक्षा मागणारा असतो. देवाला पोतराज सोडण्याची परंपरा ही खरंतर अनिष्ट आणि अमानवी आहे. एखाद्या किशोरवयीन मुलाला जन्म देणाऱ्या आई–वडिलांनी त्याला देवाच्या नावाने वाऱ्यावर सोडणे हे माणुसकीला धरून नाही. खरं तर शिक्षणाच्या, प्रगतीच्या आणि उन्नतीच्या वाटा बंद करण्याचा अधिकार त्याच्या जन्म दात्यांनाही नसतो.



– किशोर जाधव
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

सांताक्लॉज कोणालाही होता येते. तात्पुरता पोशाख परिधान करून ख्रिसमस सणात लोकांना आनंद आणि प्रेम देत फिरता येते. पण पोतराजाला मात्र आयुष्यभर त्याच ओळखीने जगावे लागते. वंचितपण, दुर्लक्ष आणि दारिद्र्याचे जीवन त्याच्या वाट्याला येते.

आजपर्यंत अनेक पोतराज होऊन गेले असतील. जे जीवन त्यांच्या वाट्याला आले असेल ते नक्कीच दयनीय असणार. कारण आषाढाचा एक महिना कमाई आणि उरलेले अकरा महिने बेरोजगारीत जीवन जगावे लागत असल्यामुळे आर्थिक टंचाईच त्या सर्वांच्या वाट्याला आली असेल. दोन्ही पात्रे रंजन आहेत आणि भक्तिभाव निर्माण करतात. पोतराज हा आषाढातील संकटमोचक असतो तर सांताक्लॉज नाताळ सणातील आनंदाचा प्रतीक ठरतो.

पोतराज स्वतः दुःखी आणि पीडित राहून दुसऱ्यांच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना करतो. आषाढात रोगराई पसरू नये म्हणून देवीकडे साकडे घालतो. स्वतःला आसूडाचे फटके मारून, दाभण टोचून समोरच्याच्या मनात करुणा निर्माण करतो आणि दान देण्यासाठी प्रेरित करतो. दुसरीकडे सांताक्लॉज स्वतःच्या पोतडीतून भेटवस्तू देतो आणि देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्यांनी घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे हा संदेश देऊन लोकांमधील दातृत्व जागृत करतो.

ही दोन्ही व्यक्तिरेखा जगाच्या वेगवेगळ्या भागात , वेगवेगळ्या कालखंडांत, धार्मिक आणि सामाजिक भावनांतून निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या व्यक्तिरेखांमधील कार्य–कारणभाव शोधण्याचा आणि त्यावर चिंतन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## निर्णय...

बालकांना बालकडू
घ्यायले लाव निर्णय
चुकले तरी चुकू द्या
हवी वैचारिक सवय

जाण ये ठेचकाळता
सहज बनती निर्भय
पंखाखाली सांभाळी
घातकठरवेलं अभय

कान उघाडणी वेळी
काहिही नको हयगय
चुकूशकेल आडरस्ता
कधीही करताना गय

लेहानमोठ्या जखमा
कठोर करायचे हृदय
पारिपत्य करी बालके
संकटे असतात निर्दय

लाड आणि शिस्तीचा
सुयोग्यसाधा समन्वय
घर करे कसलेही भय
विचित्र असे बाल वय

अदृश्यपणे राखायचे
भोवती संरक्षणवलय
किंमत हो आधाराची
येऊद्या कसला प्रलय

बनतीलं समर्थ योध्दा
कधी चाखू दे पराजय
अडथळ्याचे शर्यतीत
सुखदवाटणार विजय

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

## सर्वांगीण विकास साधणारी ‘गुरुकुल शिक्षण पद्धती’



राजधानी दिल्लीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव नुकताच पार पाडला. या महोत्सवाला ८०० हुन अधिक सामाजिक, धार्मिक आणि राष्ट्रप्रेमी संघटनांचे प्रतिनिधी, संत–महंत, विचारवंत, अधिवक्ता, जेष्ठ पत्रकार, विचारवंत, उद्योगपती यांसह मंत्री आणि राजकीय मंडळींनी उपस्थिती लावली. या महोत्सवातील एका सत्राला संबोधित करताना पावन चिंतनधारा आश्रमाचे संस्थापक पूज्य पावन सिन्हा म्हणाले की चारित्र्यवान लोकच धर्मयुद्ध करू शकतात. ज्यांच्याकडे चारित्र्य नाही, ते युद्ध जिंकू शकत नाही. भारताकडे चारित्र्य असल्यामुळे पाकिस्तानच्या विरोधातील अनेक लहान–मोठ्या युद्धांत भारताला यश मिळाले. चारित्र्य निर्माण करणे सोपे नाही आणि चारित्र्याचा शिक्षणाशी काहीही संबंध नाही. अनेक उच्च विद्याविभूषित लोक भ्रष्टाचारी आहेत. सध्याचे शिक्षण युवकांमध्ये चारित्र्य निर्माण करू शकत नाही, त्यामुळे केंद्र सरकारने चारित्र्य निमर्ाण करणारे शैक्षणिक धोरण आखावे,

गेल्या काही वर्षांत वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचा अभ्यास केल्यास समाजची नैतिकता कमालीची घसरत चालल्याचे लक्षात येईल. अपहरण, खून, बलात्कार, विनयभंग यांसारख्या घटना पुष्कळ प्रमाणात वाढल्या आहेत. ६ महिन्याच्या बालिकेपासून ८० वर्षाची वृद्धाही वासनांधांच्या दुष्कर्मांना बळी पडू लागल्या आहेत. नातेवाईक, पोलीस, शिक्षक, डॉक्टर यांसारख्यांवर काही वर्षांपूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे अशा व्यक्तीही आज स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये गुन्हेगार म्हणून समोर येऊ लागल्या आहेत. शालेय मुलांच्या दफ्तरांमध्ये सिगारेटची पाकिटे, दारूच्या बाटल्या आणि गुटखा तंबाखूच्या पुड्या सापडू लागल्या आहेत. मित्रमंडळींमध्ये संवाद साधताना शिव्या आणि अश्लील शब्दांचा वापर करत एकमेकांच्या आईवडिलांचा उद्धार करणे तरुणवर्गासह शालेय मुलांमध्येही नित्याचे होऊ लागले आहे ज्यामध्ये आता मुलीसुद्धा मागे नाहीत. हल्लीचे वेब सिरीज, हिंदी चित्रपट यांतून दाखवली जाणारी अश्लील आणि कामुक दृश्ये पौगंडावस्थेतच मुला–मुलींतील कामवासना जागृत करण्यास कारणीभूत ठरत आहेत. शालेय जीवनापासून मुलांच्या हाती स्मार्ट फोन आल्याने आणि त्यावर अल्प दरात इंटरनेट मिळू लागल्याने त्यावर ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबत मुले पॉर्न फिल्म पाहण्यात बराच वेळ व्यतीत करत असल्याचे एका सर्वेक्षणांतून समोर आले आहे. शहरासारख्या ठिकाणी लग्नापूर्वी मुलामुलींची १–२ प्रेमप्रकरणे असणे आता साधारण मानले जाऊ लागले आहे. लिव्ह इन रिलेशनशिप सारख्या पाश्चिमात्य विकृतींना येथे कायदेशीर मान्यता मिळाली असली तरी त्याचे भयंकर दुष्परिणाम सुद्धा समोर येऊ लागले आहेत. शाळेतून घरी आल्यावर किंवा सुटीच्या दिवसांत मित्रांसोबत मैदानी खेळ खेळण्याऐवजी घरी पालकांच्या मोबाइल्सवर, टीव्हीवर गेम्स खेळणे, रिल्स पाहणे हल्लीच्या शाळकरी मुलांना अधिक आवडू लागले आहे. या सर्वांतून त्यांच्या डोळ्यासह मानसीक आरोग्यावरही परिणाम होऊ लागले आहेत.

प्राचीन भारतीय संस्कृती, आपले धर्मग्रंथ, वेद–उपनिषिदे ही संस्कारांची कोठारे आहेत; मात्र आज ती शाळा महाविद्यालयांतून शिकवली जात नाहीत. देश स्वतंत्र होऊन आज ७७ हुन अधिक वर्षे उलटूनही इंग्रजांनी भारतीयांवर लादलेली शिक्षणपद्धती भारतीयांनी झिडकारलेली नाही, त्यामुळे भारतीयांना व्यवहारज्ञान देणारी ही शिक्षणपद्धती भारतीयांत संस्कार, नीती आणि नैतिक मूल्य रुजवण्यात असमर्थ ठरत आहे. इंग्रज भारतात येण्याच्या आधीपासून भारतातील लोक नीतिवान आणि सुसंस्कारी होते. त्यांना शिक्षण देणारे गुरुकुल गावागावांत होते, अशी नोंद तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी केली आहे. गुरुकुल शिक्षणपद्धती ही वैदिक काळापासून चालत आलेली समृद्ध शिक्षण पद्धती आहे. गुरुकुलात राहून विद्यार्थी सर्वांगीण शिक्षण घेत असत. गुरुकुलात घडलेला विद्यार्थी हा सर्वांगाने आदर्श असाच असे. त्यामुळे सुसंस्कृतता हे भारताचे तत्कालीन प्रमुख वैशिष्ट्य होते. आपल्या प्रत्येकावर देव, ऋषी, पितर आणि समाज अशी चार ऋणे असतात आणि ती आपल्या जीवनकाळात फेडावीत असे हिंदू धर्मशास्त्र सांगते. गुरूकुलातून तयार होणारा प्रत्येक विद्यार्थी ही ऋणे फेडण्यासाठी प्रयत्न करत असतो त्यामुळे त्याच्यातील नीतिमत्ता अबाधित राहते. इंग्रजांनी हीच मेख ओळखून गुरुकुल पद्धतीवर घाला घातला आणि मॅकॉलेप्रणित शिक्षण व्यवस्था भारतात रुजवली. गेल्या काही वर्षांत भारतातील अनेक राज्यांत गुरुकुल निर्माण होऊ लागले आहेत. ज्यामध्ये मुलांची जात पाहून नव्हे तर आवड पाहून प्रवेश दिला जातो. या गुरुकुलांतून मुलांना रामायण, महाभारत आदी ग्रंथांसोबत वेद, वेदांग, उपनिषिदे, पुराण यांची शिकवण दिली जाते.

मुलांना पहाटे लवकर उठून व्यायामाची सवय लावली जाते. विविध स्तोत्रे, मंत्र, अभंग त्यांच्याकडून मुखोद्गत करून घेतले जातात. स्वावलंबनाचे धडे दिले जातात, संपूर्ण अध्ययन काळात अठरा विद्या, चौसष्ट कला शिकवल्या जातात. गोपालनाचे आणि गोसंवर्धनाचे महत्व बिंबवून सकल प्राणिमात्राचे जीवन समृद्ध आणि सुसह्य करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले जाते. हल्ली गुरुकुलांतून स्थानिक शिक्षण विभागानुसार शालेय अभ्यासक्रमही शिकवला जातो. अनेक गुरुकुलांतून पदवी अभ्यासक्रमासह पदव्युत्तर वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणही दिले जाते. अनेक डॉक्टर्स आणि इंजिनिअर्स गुरुकुलातून शिक्षण घेऊन समाजाच्या सेवेसाठी बाहेर पडू लागले आहेत. वैदिक शिक्षणासोबत व्यावहारिक शिक्षणही या ठिकाणी दिले जात असल्याने गुरुकुलात सिद्ध होणारी प्रत्येक व्यक्ती ही नीतिमान, धैर्यवान आणि व्यवहारकुशलही बनते. निसर्गाच्या सानिध्यात वसणारे हे गुरुकुल मुलांना चांगल्या आरोग्यासह कुशल व्यक्तिमत्वही बहाल करते. समाजाच्या ढासळत्या नीतिमत्तेवर समाजात गुरुकुल शिक्षणपद्धतीचे महत्व रुजवणे आणि मुलांना गुरुकुलात घालणे हा एक उत्तम पर्याय आहे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## हभप रंगनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताहाची पालखी मिरवणुकीने सांगता...



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१६, पालम (परभणी) :** पालम शहरातील रंगनाथ महाराज मंदिर येथे रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त सुरू असलेल्या सप्ताहाची आज सांगता झाली.

आर्यवैश्य समाज मंडळ व गावकरी यांच्या वतीने प्रतिवर्षी रंगनाथ महाराज गुरुजी परभणीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते, दि. ९ डिसेंबर पासून सुरू असलेल्या या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तन सेवा संपन्न झाली, सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दिनांक १६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रंगनाथ महाराज गुरुजी परभणीकर यांच्या प्रतिमेची भव्य पालखी मिरवणूक मंदिरापासून शहरातील मुख्य मार्गावरून भक्तिमय वातावरणात, टाळ मृदंगाच्या गजरात संपन्न झाली. यामध्ये शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, कीर्तनकार, भजनी मंडळी, आर्य वैश्य समाज बांधव व महिला, व परिसरातील भाविक भक्त, गावकरी मंडळी सहभागी झाले होते.

या दरम्यान पालखी मिरवणूक नंतर गुरुवर्य भागवताचार्य मराठवाडा भूषण, ह भ प नारायण महाराज पालमकर यांचे पूजेचे कीर्तन संपन्न झाले, यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. सप्ताह यशस्वीतेसाठी समस्त आर्य वैश्य समाज बांधव व गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

## तनुजा मढवी यांचा जुईनगर मधील रस्त्यांसाठी अथक प्रयत्न पण त्यात अनेकांचा खोडा




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१६, जुईनगर (नवी मुंबई) :** जुईनगर प्रभाग क्रमांक २२ मध्ये सेक्टर २३ येथील नवरात्र उत्सव चौकात यूटीडब्ल्यूटी हे तंत्रज्ञान वापरून नव्याने रस्ता बनवला जाणार आहे. या ठिकाणी दरवर्षी नवरात्र उत्सव भरवला जातो तसेच त्या ठिकाणी माणसांची व वाह्वनांची गर्दी असते. त्या वेळी खरबडीत रस्त्यामुळे नागरिकांना त्रास होत असतो.

तसेच नवी मुंबईतील बहुतेक चौकांचे काँक्रिटीकरण झाले असता, आहे ते काम माजी नगरसेविका तनुजा मढवी यांच्या अथक प्रयत्नाचे फलित असून ह्या कामासाठी अनेकांनी खोडा घातलेला होता त्याही परिस्थितीत नगरसेविकेने सर्व अडचणींवर मात करत हे काम मंजूर करून घेतले आहे या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. लवकरच ते काम चालु करण्यात येईल. असे माजी नगरसेविका तनुजा मढवी यांनी म्हटले आहे.

# सोयगावात अवैध वाळू माफियांचा धुडगूस !

## महसूल अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत हायवा पसार, महिला कर्मचाऱ्यांचा थरारक बचाव



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.१६, सोयगाव :** सध्याच्या परिस्थितीत सोयगाव तालुक्यात अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असतानाच महसूल विभागाच्या कारवाईला खुलेआम आव्हान देणारी गंभीर घटना समोर आली आहे. सोयगाव तहसील कार्यालयासमोर उभे असताना जळगाव जिल्ह्यातून अवैध वाळूने भरलेला हायवा जात असल्याचे लक्षात येताच नायब तहसीलदार संभाजी देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ पाठलाग करत सदर हायवा जंगलाताडा परिसरात पकडला.

तपासणीदरम्यान हायवाकडे कोणताही वैध परवाना (रॉयल्टी) नसल्याचे स्पष्ट झाले. कारवाईसाठी वाळू पथकातील दोन पुरुष कर्मचारी व एक महिला कर्मचारी वाहनात बसण्याच्या तयारीत असताना चालक व महसूल कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. याच गोंधळाचा फायदा घेत हायवा चालकाने अचानक वाहन ताब्यात घेऊन सोयगाव–शेंदुर्णी बायपास रोडने तब्बल ७० ते ८० किमी प्रतितास वेगाने गाडी पळवली, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

विशेष म्हणजे, या हायवाम ध्ये महसूल पथकातील कर्मचारी बसणार होते. मात्र चालकाने मुद्दाम वेळकाढूपणा करत जंगलाताडा येथे गाडीतून उतरून चावी घेऊन पलायन केले. काही वेळानंतर वाहनाचा म ालक (सांगण्यावरून) हायवा घेऊन सोयगावच्या दिशेने येत असताना, महसूल कर्मचाऱ्यांना चकवा देत तोही पसार झाल्याचे सांगण्यात येते. या थरारक घटनेत महिला कर्मचारी थोडक्यात बचावल्या, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

घटनेनंतर संपूर्ण महसूल पथकाने थेट सोयगाव पोलीस स्टेशन गाठले. मात्र शासकीय कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून सरकारी कामात अडथळा आणण्याचा गंभीर प्रकार असूनही गुन्हा दाखल करण्यासाठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली. रात्री उशिरापर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू होती. या कारवाईदरम्यान नायब तहसीलदार संभाजी देशमुख, गणेश ठोबरे, संतोष राऊत, संभाजी बोरसे, मंडळ अधिकारी जरंडी, पडके, पडीत, डिघाळे, देवताळे, भोबडे, शिवाजी शेरे, अंकुश चव्हाण आदी कर्मचारी उपस्थित होते.

या घटनेमुळे सोयगाव तालुक्यात अवैध वाळू माफियांचे मनोबल वाढल्याचे स्पष्ट झाले असून, महसूल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित चालक व वाहन मालकावर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# बांधकाम कामगारांच्या नावावर लूटमार !

## पेटी–भांडी–भाडे योजनेच्या आमिषाने हजारोंची उकळपट्टी



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.१७, सोयगाव :** बांधकाम कामगारांना शासनाकडून मिळणाऱ्या पेटी, भांडी, चक्की व भाडे योजनांच्या नावाखाली सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रम ाणावर आर्थिक लूटमार व पिळवणूक सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. काही सीएससी सेंटर व नेट कॅफे चालकांकडून केवायसीच्या नावाखाली बांधकाम कामगारांकडून सर्रास ५०० ते १५०० रुपयांपर्यंत पैसे उकळले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

विशेष बाब म्हणजे, अनेक बांधकाम कामगारांना आवश्यक पेटी व भांडी आधीच शासनाकडून मिळालेली असतानाही, काही एजंटांकडून यादी मिळवून थेट फोन करून केवायसी करून घ्या, अन्यथा लाभ बंद होईल, असे खोटे आमिष दाखवले जात आहे. गरीब व अडचणीत असलेले कामगार या भूलथापांना बळी पडून पैसे देत आहेत.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सिल्लोड तालुक्यातील काही व्यक्ती सोयगाव येथे येऊन विघ्नहर्ता नेट कॅफे परिसरात ठाण मांडून दररोज १०० ते १५० कामगारांकडून प्रत्येकी ५०० रुपयांप्रमाणे उकळपट्टी करत असल्याचा आरोप आहे. यामुळे दररोज सुमारे ५० हजार रुपये, तर महिन्याला लाखोंची रक्कम गोळा केली जात असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, सावळतबारा, मोलखेडा, नांद तांडा परिसरातून काही बांधकाम कामगार केवायसीसाठी सोयगाव येथे आले असता, त्यांना आधीच पेटी व भांडी मिळाल्याचे स्पष्ट झाले. मात्र, यादीच्या आधारे फोन करून त्यांना विनाकारण बोलावण्यात आले. तुम्हाला केवायसीची गरज नाही, असे नंतर सांगत एजंटांनी काम गारांची वेळ, पैसा व मानसिक शांतता हिरावून घेतली. यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला.

या प्रकाराबाबत सावळतबारा–मोलखेडा येथील बांधकाम कामगार नागरिकांनी इतर कामगारांना अशा आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन केले आहे. यासंदर्भात सुशिलाबाई वारगणे (रा. मोलखेडा, सावळतबारा) यांनीही आपला अनुभव मांडला.

दरम्यान, बांधकाम कामगार कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्यालयामध्ये केवळ कागदपत्रांची पडताळणी केली जाते. नेट कॅफे चालक किती पैसे घेतात, याबाबत आम्हाला माहिती नाही. आमचा त्यांच्याशी कोणताही संबंध नाही. शासनाच्या नियमानुसार केवायसीसाठी केवळ १०० ते १५० रुपये शुल्क आकारले जावे व त्याची पावती देणे बंधनकारक आहे. पावती न दिल्यास केवायसी ग्राह्य धरली जाणार नाही. सध्या आचारसंहिता लागू असल्याने संबंधित साईट १५ ते २० दिवस बंद राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी बांधकाम कामगार व नागरिकांकडून होत आहे.

## विज्ञान प्रदर्शनीत शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेच्या 'जलसंवर्धन' प्रकल्पाला द्वितीय पुरस्कार



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** सावनेर पंचायत समिती अंतर्गत बावनगाव येथील अभ्युदय ग्लोबल विलेज शाळेत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मोठ्या उत्साहात पार पडली. या प्रदर्शनीत शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'जलसंवर्धन आणि व्यवस्थापन' या प्रकल्पाने आपली छाप पाडत द्वितीय क्रमांक पटकावला.

*** नाविन्यपूर्ण प्रयोगांची मेजवानी...**

दिनांक १५ व १६ डिसेंबर रोजी आयोजित या प्रदर्शनीत तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, पर्यावरण, तंत्रज्ञान, आरोग्य आणि सामाजिक विज्ञान या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण व संशोधनात्मक प्रकल्प सादर केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी मनोज कुमार हिरुडकर होते. प्रदर्शनीचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी कश्यप सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जनबंधू, जितेंद्र ठाकरे, शिक्षण विस्तार अधिकारी पुरुषोत्तम मुंडे, तसेच मुख्याध्यापक वडस्कर, देशपांडे, गांधी, केंद्रप्रमुख बलवतकर, सोनवणे, भराडे, लांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेतील विद्यार्थी दिव्यांका नाग आणि हिम ांशू शिंदूरकर यांनी 'जलसंवर्धन व व्यवस्थापन' या विषयावर अत्यंत प्रभावी मॉडेल सादर केले होते वाढती पाणीटंचाई आणि त्यावर उपाययोजना यावर या प्रकल्पात भर देण्यात आला होता. या यशात त्यांना शिक्षिका कोमल दुरुगवार व प्राजक्ता गोमकाळे यांचे म ोलाचे मार्गदर्शन लाभले.

अभ्युदय ग्लोबल व्हिलेज स्कूल, बावनगाव या शाळेला प्रथम क्रमांक मिळाला तर द्वितीय क्रमांक शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल खापरखेडा या शाळेला मिळाला तर तृतीय क्रमांक संत ताजुद्दीन बाबा वाकी शाळेला मिळाला.

तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनी म ध्ये घवघवीत यश संपादन केल्याबद्दल शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेच्या मुख्याध्यापिका मोनाली सुरकर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे आणि म ार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## मंद्रूप ग्रामपंचायतकडून मालमत्तासह पाणीपट्टी करात ५० टक्के सवलत

### लाभ घेण्याचे सरपंच अनिता कोरे यांचे आवाहन



ग्रामपंचायतीच्या निधीत मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे गावातील प्रलंबित असलेली अनेक मूलभूत कामे मार्गी लावणे शक्य होईल. सरपंच कोरे यांनी शेवटी पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन केले की, 'कर भरा सवलत मिळवा आणि गावाच्या विकासात हातभार लावा. एखाद्या वेळेस शासनाकडून अशी संधी मिळत असते त्यामुळे संधीचे सोने करा वाया जाऊ देऊ नका. असे आवाहन सरपंच अनिता कोरे व सर्व ग्रामपंचयत सदस्य यांनी केले आहे.

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१७, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप ग्राम पंचायतच्या सरपंच अनिता कोरे व ग्रामविकास अधिकारी नागेश जोडम ोठे यांनी ग्रामस्थांना आवाहन केले आहे की आपल्याकडील घरटॅक्स थकीत असेल तर ३१ डिसेंबर पर्यंत भरा आणि ५० टक्के सवलत मिळवा असे आवाहन केले आहे.

मंद्रूप ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांसाठी मोठी दिलासादायक घोषणा घरपट्टी, पाणीपट्टीवर ५० टक्के सवलत ३१ डिसेंबरपर्यंत कर भरा व गावाच्या विकासात हातभार लावा, ग्रामीण भागातील करदात्यांसाठी राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे त्यामुळे घरपट्टी, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती यांसारख्या नियमित करांवर ५० टक्के विशेष सवलत जाहीर केली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कराची एकरकमी भरपाई करणाऱ्या करदात्यांना ही सवलत लागू होणार आहे. या योजनेची अंतिम मुदत ३१ डिसेंबर इतकी निश्चित करण्यात आली असून,

वेळेत कर न भरल्यास सवलत मिळणार नाही, असा शासनाचा स्पष्ट आदेश आहे. त्यामुळे मंद्रूप गावातील सर्व नागरिकांनी ही संधी ओळखून तत्काळ कर भरणाकरावा, असे जाहीर आवाहन गावाच्या सरपंच कोरे यांनी केले आहे. राज्य शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ही विशेषकर सवलत योजना लागू केली आहे.

या अभियानाचा उद्देश ग्राम पंचायती स्वयंपूर्ण करणे, गावांतील मूलभूत सुविधा मजबूत करणे आणि विकास कामांना निधी उपलब्ध करून देणे हा आहे. सरपंच कोरे म्हणाल्या की 'ग्रामपंचायत आपल्या गावाची लोकशाहीतील ही पहिली आणि सर्वात मोठी महत्त्वाची संस्था आहे. गावातील प्रत्येक सुविधा सुधारण्यासाठी निधी आवश्यक असतो. शासनाने दिलेली ५० टक्के सवलतीची संधी म्हणजे ग्राम पंचायतीला आर्थिक सुबत्ता प्राप्त करण्यासाठी ग्रामस्थांसाठी उघडलेले सुवर्णद्वारच आहे. या सवलत योजनेद्वारे गावातील हजारो थकबाकीदारांना दिलासा मिळणार आहे.

# अवैध रेती वाहतुकीच्या निषेधार्थ मुदखेड कडकडीत बंद

## अवैध रेती उपशाचे घाट बंद करण्याची तहसीलदारांकडे मागणी...

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** दि.१६ डिसेंबर रोजी रेतीने भरलेल्या हायवा टिप्परणे मुदखेड येथील रहिवासी असलेल्या संतोष टाक नावाचा इसमाला चिरडल्याने शेवटी त्याचा मृत्यू झाला होता. त्याचा निषेध म्हणून मुदखेड नगरवासीयांनी १७ डिसेंबर रोजी मुदखेड बंदची हाक दिली व त्यादिवशी अवैध रेती वाहतूक कायमची बंद करावी, तसेच ज्या घाटावरून अवैध उत्खनन होते त्यावर प्रतिबंध लावावा अशा मागण्या घेऊन तहसील कार्यालयांवर मुदखेडकरांचा मोर्चा धडकला

गेल्या अनेक वर्षांपासून मुदखेड तालुक्यांत होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीमुळे जनसामान्यांचा जीव धोक्यात आलेला आहे. एवढेच नव्हे तर यात अनेकांचे बळी गेले. कांही दिवसांपूर्वी शाळकरी मुलं रेतीने भरलेल्या गाडीखाली येता येता वाचले. परंतू १६ डिसेंबर रोजी रेतीने भरलेल्या गाडीने मुदखेड येथील गरीब स्वर्णकार मजूर इसमाचा बळी गेल्याने सगळीकडेच हळहळ व्यक्त होत आहे. अखेर याचं गांभीर्य घेत संतप्त मुदखेडकरांनी तालुक्यातील अवैध रेती वाहतूक कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून शहरांतील जनसामान्यांपासून, समाजसेवी, व्यापारी, युवक व सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी १७ डिसेंबर रोजी मुदखेड बंदची हाक दिली.त्या अनुषंगाने शहरातली सर्व व्यापारपेठ, दुकानें, हॉटेल पूर्णपणे बंद होती.

दि.१७ डिसेंबर रोज बुधवार ११ वाजण्याच्या सुमारास मोंढा मैदानातल्या गणपती मंदिराजवळ नागरिक मोर्चासाठी एकत्र जमले. तेथून उमरी चौकात येऊन संतोष टाकला न्याय मिळालाच पाहिजे, अवैध रेतीसह अवैध उत्खनन पूर्णपणे बंद झालं पाहिजे, धडक दिलेल्या हायवासह गाडी मालकावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा नोंद झाला पाहिजे अशी घोषणा बाजी करण्यात आली. तेथून मोर्चा थेट तहसील कार्यालयांवर



धडकला. तिथेही मोर्चे कऱ्यांनी अशीच घोषणाबाजी करुन पोलीस व महसूल प्रशासनाचं लक्ष वेधलं.

त्यांनी मुदखेड तहसील चे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना निवेदन देऊन तालुक्यांत रेती उपस्यात येत नसतांना एवढे अवैध उत्खनन कसे असा जाब विचारला. अवैध रेती वाहतूक कायमची बंद करुन अवैध रेती घाटावर प्रतिबंध लावण्याची मागणी केली. तहसीलदार यांनी देखील यावर नियमांनुसार कारवाही करण्यात येईल असे सांगितले. एकंदर पाहाता कालच्या मुदखेड बंदला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाल्याने मुदखेड कडकडीत बंद असलेले पहायला मिळाले.

# आरोग्य सेवेत 'एआय' तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात यावा – मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, मुंबई :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, वेगवान आणि लोकाभिमुख करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'वर्षा' शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीत 'समग्र' संस्थेच्या वतीने सार्वजनिक आरोग्य सेवा बळकटीकरणाबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढेल, उपचार अधिक अचूक व वेळेत मिळतील आणि ग्रामीण तसेच दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा प्रभावीपणे पोहोचवता येतील. आजच्या डिजिटल युगात आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन आणि एआय आधारित उपाययोजना अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्य संस्थांचे स्टार रेटिंग, आरोग्य सेवांचा समीक्षा अहवाल, आरोग्य हेल्पलाईन, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तसेच सेवा गुणवत्तेचे नियमित रिव्ह्यू यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमुळे नागरिकांचा आरोग्य सेवांवरील विश्वास अधिक दृढ होईल, असे फडणवीस यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान 'आपले गाव, आरोग्य संपन्न गाव' योजना, पॉलिएटिव्ह केअर, सिकलसेल आजारावरील उपचार, वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया सुलभ करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मानधन वाढवणे, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन जलद गतीने करणे याबाबत मागण्या मांडण्यात आल्या. याशिवाय आयुष संचालक, प्रशिक्षण संचालक आणि नर्सिंग क्षेत्रातील नवीन पदे निर्माण करण्याची आवश्यकताही उपस्थित अधिकाऱ्यांनी मांडली.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत छंद जोपासावेत : उपायुक्त लोकरे



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१८, सोलापूर :** विद्यार्थ्यांनी कोणताही अभ्यास करताना तो समजून घेऊन केला पाहिजे. गुरुजी व शिक्षक काय शिकवतात याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. चांगले अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर तसेच जबाबदार समाजसेवक घडण्यासाठी मोबाईल व टीव्हीवर वेळ न घालवता अभ्यासाबरोबरच चित्रकला, अवांतर वाचन यांसारखा एखादा छंद जोपासणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमास सोलापूर महापालिकेच्या उद्यान विभागाचे अजयकुमार चव्हाण, समाजसेवक जव्हार मुंदडा, मारवाडी युवा मंचाचे अध्यक्ष आनंद शर्मा, संस्थेचे अध्यक्ष महेश कासट यांची प्रमुख उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दृश्यकला विभागाचे धनंजय टाकळीकर व दयानंद पटणे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

ही चित्रकला स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली होती. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी केले, तर गणेश येळमेली यांनी आभार प्रदर्शन केले.

प्रास्ताविकात संस्थापक अध्यक्ष महेश कासट यांनी सांगितले की, श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त दहा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून त्यापैकी हा सातवा उपक्रम आहे. यामध्ये विद्यार्थी दत्तक योजना, सॅनिटरी पॅड वितरण, स्टील पाणी टाकी स्थापन, अन्नदान, दिवाळी फराळ वाटप, हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना चादर वाटप अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष अलकुंटे, दीपक बुलबुले, अभिजीत व्हनकळस, श्रीरंग रेगोटी, महेश भाईकट्टी, सुरेश लकडे, राजेश केकडे, श्रीनाथ श्रीगन, शिला तापडिया, सुजाता सक्करगी, अक्षता कासट, मनुश्री कासट, आर्या लचके, श्रेया लचके, शुभांगी लचके, रुपा कुत्ताते आदींनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :**

**लहान गट (इ. ३ री ते ५ वी)**

प्रथम : पृनित बोराडे

द्वितीय : चेचक राका

तृतीय : स्वरा मनाळे

उत्तेजनार्थ : ऋतुजा हुळ्ळे, आयुष दंतकाळे

**मोठा गट (इ. ६ वी ते ८ वी)**

प्रथम : सृष्टी हराळे

द्वितीय : आरवी राका

तृतीय : ध्रुवी राका

उत्तेजनार्थ : कार्तिकी स्वामी, शर्य हलकुडे

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळाल्याने पालक व उपस्थित मान्यवरांकडून श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

# मतदान प्रक्रियेत सर्व मतदारांनी सहभाग नोंदवावा : आयुक्त अकुनुरी नरेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर रोज सोमवारला जाहीर केलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळापत्रकानुसार महानगरपालिका मतदारसंघाकरीता १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. या निवडणूक प्रक्रियेत सर्व मतदारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अकुनुरी नरेश यांनी पत्रकार परिषदेत केले.

मंगळवार, १६ डिसेंबरला आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले, महानगरपालिकेत १७ प्रभाग असून, निवडून द्यायच्या नगरसेवकांची संख्या ६६ असून, एकूण मतदार २ लाख ९९ हजार ९९४ आहे. त्यात, १ लाख ४९ हजार ६०९ पुरुष, १ लाख ५० हजार ३५४ महिला आणि अन्य ३१ मतदारांचा समावेश आहे. २३ डिसेंबरपासून निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. निवडणूक आयोगाने वेळापत्रक जाहीर केले असून, त्यानुसार, महानगरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी २३ ते ३० डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत, पण २५ व २८ डिसेंबर रोजी नामनिर्देशनपत्रे स्वीकारले जाणार नाहीत. नामनिर्देशनांची छाननी ३१ डिसेंबरला सकाळी ११ वाजल्यापासून सुरु होईल. वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द छाननी पुर्ण झाल्यानंतर लगेच प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम दिनांक २ जानेवारी २०२६ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत, तर ३ जानेवारीला निवडणूक चिन्ह नेमून देण्यात येईल. त्याच दिवशी, अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. १५ जानेवारीला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होईल. मतमोजणी बंगाली कॅम्प येथील झोन परिसरात होईल. १६ जानेवारी सकाळी १० वाजल्यापासून निकाल लागेल, असेही आयुक्त अकुनुरी नरेश यांनी सांगितले.

मनपा झोन क्रमांक ३ कार्यालय येथे स्ट्रॉंग रुम बनविण्यात आली असून, मतमोजणी तेथेच करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सिंगल विंडो सिस्टम, टोल फ्री क्रमांक, आचारसंहिता कक्ष, आदी सुविधा मनपातर्फे करण्यात येणार आहे. मनपा क्षेत्रातील प्रत्येत मतदान केंद्रावर दिव्यांग मतदाराकरीता त्यांचे मागणीनुसार 'व्हीलचेअर' ची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व मतदान केंद्रावर या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत, असेही ते म्हणाले.

**दुबार मतदार ७८०७**

महानगरपालिकेच्या मतदार यादीत दुबार मतदारांची संख्या ७ हजार ८०७ एवढी असल्याची माहितीही अकुनुरी नरेश यांनी दिली.

## थोडक्यात

# बिबट्याच्या हल्लयातील पीडित कुटुंबाला २५ लाखांची मदत

## आमदार दाते यांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील किन्ही येथे बिबट्याच्या हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या कै.भागूबाई विश्वनाथ खोडदे यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या वतीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत आज पारनेर – नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. या मदतीमध्ये १० लाख रुपयांचा धनादेश व १५ लाख रुपये एफडी स्वरूपात विश्वनाथ लक्ष्मण खोडदे यांचे नावे देण्यात आले. यावेळी आमदार दाते यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करत शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. बिबट्यांच्या वाढत्या संचारामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतात व मोकळ्या परिसरात काम करणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, रात्रीच्या वेळी अनावश्यक बाहेर जाणे टाळावे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहनही त्यांनी केले. दाते यांनी सांगितले की, बिबट्यांच्या हल्लयांच्या पार्श्वभूमीवर वनविभाग व शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील. नागरिकांच्या जीवित सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे, पारनेर प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे, भाळवणी वनपाल के. एस. साबळे, कान्हूर पठार वनरक्षक एन. व्ही. बडे, भाळवणी वनरक्षक बी. एस. दवणे, चालक दिगंबर विरोळे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# दरेगाव शिवारात बिबट्याने पाडला वासरांचा पडशा



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील मौजे चिलपिंपरी, येथील रहिवासी पुंडलिक विठ्ठल गाढे यांची शेती दरेगाव मधून असून त्यांचा या शेतीमध्ये जनावरांचा आखाडा शेतात आहे. शेतात एक म्हैस आणि त्याचं वासरू शेतात होते. रोजच्याप्रमाणे शेतांमध्ये म्हशीला बांधून रात्री दूध घेऊन घरी आले. आणि सकाळी सहाच्या दरम्यान शेतकरी पुंडलिक गाढे यांनी दूध काढण्यासाठी शेताकडे गेले असता बिबट्याने म्हशीच्या वासरांना खाऊन मारून टाकले होते. त्यांनी हे दृश्य पाहून आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी गावातल्या व्यक्तींना फोन करून बोलावून घेतले. ही बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरले बिबट्याने हल्ला केला असं ऐकताच सर्व गावकऱ्यांनी त्यांच्या शेताकडे धाव घेतली. चिलपिंपरी, टाकळी, खुजडा, दरेगाव, या गावांमधील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. महिला व पुरुषांमध्ये भितीचे वातावरण झाल्यामुळे शेतकरी शेताकडे जायला भीत आहेत. या बिबट्याचं बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने काहीतरी पावले उचलावीत अशी शेतकरी वर्गातुन केल्या जात आहे.

# केजमधील 'शिक्षक कॉलनी' चौकास अखेर स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे नाव




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, केज (बीड) :** केज नगरपंचायतच्या इतिहासात मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील बीड–केज महामार्गावरील चौकास दिवंगत लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे नाव देण्याचा बहुप्रतिक्षित ठराव आजच्या नगरपंचायत सर्वसाधारण सभेत मार्गी लागला. या निर्णयामुळे समस्त शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे.

या चौकास स्व.मुंडे साहेबांचे नाव देण्याची मागणी पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाश एकनाथ मुंडे यांनी सर्वप्रथम केली होती. मुंडे साहेबांच्या नुकत्याच झालेल्या जयंतीनिमित्त, दि. १२/१२/२०२५ रोजी, पत्रकार प्रकाश मुंडे आणि त्यांच्या सहकारी युवक मित्रांनी हा चौक 'स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चौक' म्हणून स्थापित करण्याची मोहीम सुरू केली होती.

याच लोकभावनेचा आदर करत, पत्रकार प्रकाश मुंडे यांनी नगरपंचायतकडे रीतसर ठराव दाखल केला होता, ज्याला आजच्या सभेत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे नेते हारुणभाई इनामदार हे या ठरावाचे सूचक होते आणि तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ऐतिहासिक ठराव मंजुरीमध्ये मोलाची भूमिका बजावणाऱ्या सर्वांचे शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत. सिताताई बनसोड (नगराध्यक्षा), बालासाहेब जाधव (नगरसेवक), हारुणभाई इनामदार (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, अजित पवार गटाचे नेते व ठरावाचे सूचक) केज नगरपंचायत मधील सर्वपक्षीय नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकारी यांचे या निर्णयासाठी विशेषतः यांचे आभार व्यक्त करण्यात आले. पत्रकार प्रकाश मुंडे यांनी सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानताना सांगितले, आज नगरपंचायतने लोकनेत्यांच्या नावाचा सन्मान करून जनतेच्या मागणीचा आदर केला आहे. यामुळे भावी पिढीला साहेबांचे कार्य प्रेरणा देत राहील. केज–बीड महामार्गावरील या चौकाला स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे नाव मिळाल्याने, केज शहराच्या इतिहासात हा दिवस सुवर्ण अक्षरांनी नोंदवला गेला आहे.